# प्रेस नोट दि.१४/०३/२०१९
# येरवडा पोलीस स्टेशन

**येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीतील गुन्हेगार टोळीतील ३ सराईत गुन्हेगारांना पुणे शहर, पुणे जिल्हा व पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातून ६ महिन्यांकरीता तडीपार करण्यात आले.**

येरवडा पोलीस स्टेशनचे पर्णकुटी पोलीस चौकीचे हद्दीत जबरी चोरी, गंभीर दुखापत, घातक शस्त्रे जवळ बाळगणे, दुखापत करणे अशा स्वरूपाचे गुन्हे करून दहशत माजविणारे टोळीतील प्रमुख (१) विलास रघुनाथ वाघ, वय २४ वर्षे, रा. सर्व्हे नं. १०३, गांधीनगर, येरवडा, पुणे (२) अक्षय ईश्वर चव्हाण, वय २४ वर्षे, रा. सदर (३) ओंकार मच्छिंद्र निळ, वय १९ वर्षे, रा. जयप्रकाशनगर, येरवडा, पुणे यांचे विरूध्द मुंबई पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे तडीपार बाबतचा प्रस्ताव तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिनकर मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा. ४६५० गुलाब शिवले, पो.ना. ७८३ गणेश पाटोळे, पो.शि. ७२८० शरद बांगर यांनी तयार करून मा.पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ-४, पुणे यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांनी पाठपुरावा करून मा.पोलीस उप आयुक्त सो. परि-४ श्री. प्रसाद अक्कानवरु यांना नमूद टोळीतील गुन्हेगार यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी दाखवून दिली असून, सदर प्रस्तावाची चौकशी पुर्ण करून मा.श्री.प्रसाद अक्कानवरू सो. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४ पुणे यांनी त्यांचेकडील तडीपार आदेश क्र. २३/२०१९ दि.१४/०३/२०१९ अन्वये वरील तीनही सराईत गुन्हेगारांना सहा महिन्यांचे कालावधीकरीता पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रातून तडीपार केलेले आहे.

अशा प्रकारे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिनकर मोहिते, श्री.राजेंद्र कदम, पो.हवा. ४६५० गुलाब शिवले, पो.ना. ७८३ गणेश पाटोळे, पो.शि. ७२८० शरद बांगर सराईत गुन्हेगारांचे टोळीस तडीपार करण्यासाठी प्रस्ताव सादर करून व वेळोवेळी पाठपुरावा करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे